## प्रकरण सहावे

# उपसंहार

## प्रकरण सहावे

## उपसंहार

'चाकाची खुर्ची' हे नसीमा हुरजूक यांचे आत्मकथन आहे. अपंगांसाठी सामाजिक कार्य करणाऱ्या, स्वत: अपंग असणाऱ्या एका मुस्लिम मराठी लेखिकेचे हे आत्मकथन असल्यामुळे संशोधनात्मक अभ्यास करताना मुस्लिम मराठी साहित्याच्या संकल्पनेचा विचार मांडलेला आहे. त्यासाठी मान्यवर लेखकांचे मुस्लिम मराठी साहित्यावरील विचार चर्चेसाठी घेतलेले आहेत आणि मुस्लिम मराठी साहित्याची सुस्पष्ट व्याख्या मांडण्यात आली आहे.

भारतीय संस्कृती हिंदू-मुस्लिम या दोन समाजांच्या सान्निध्य संपर्कामुळे मिश्र बनलेली आहे. अनेक बाबतीत हिंदू-मुस्लिम या दोन्ही धर्मियांनी परस्परांना कमी-अधिक प्रमाणात अनुसरलेले आहे.

मुस्लिम मराठी साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन इत्यादी सर्व साहित्य प्रकारात मुस्लिम मराठी लेखकांनी योगदान दिलेले आहे. या साहित्याला मराठी साहित्याइतकी जुनी परंपरा आहे.

भारत-पाकिस्तान फाळणीमुळे मुस्लिमांना शत्रुस्थानी समजण्याची जी भारतीयांची कमी-अधिक प्रमाणातील मानसिकता निर्माण आहे तीच आधुनिक मुस्लिम मराठी साहित्याच्या अवहेलनेस प्रामुख्याने कारणीभूत आहे. तसेच काही साहित्यिक, विचारवंत व राजकारणी लेखक यांच्या सापेक्ष लेखनाच्या प्रतिकूलतेमुळेही एतद्देशीय मुस्लिम आणि त्यांचे साहित्य संशय, पूर्वग्रहदूषितता आणि आकसाला बळी पडते, असे काही मुस्लिम मराठी लेखकांचे मत आहे.

मुस्लिम मराठी आत्मकथनाच्या अनुषंगाने विचार मांडण्यात आले आहेत. चरित्र-आत्मचरित्र आणि आत्मकथन या साहित्य प्रकारातील साम्यभेदच त्यांना वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण बनवितात. प्रमुख मराठी आत्मचरित्र प्रवाहाला समांतर मुस्लिम मराठी आत्मचरित्र लेखन झालेली आहे. ही आत्मचरित्रे अल्पसंख्यांक समाजाचे प्रतिनिधित्व करणारी असल्यामुळे संख्येने अत्यल्प आहेत. अल्पसंख्यांक म्हणून आलेल्या जीवनजाणिवा कमी-अधिक प्रमाणात त्यात उमटलेल्या आहेत.

मुस्लिम मराठी आत्मकथने लेखक-लेखिकांनी लिहिली असून त्यात लेखिकांनी लिहिलेली आत्मकथने फारच मोजकी आहेत, मात्र ती अत्यंत प्रभावी व वेधक ठरलेली आहेत. मुस्लिम म्हणून व अल्पसंख्यांक म्हणून भारतीय मुस्लिमांना समाजात जे जीवन जगावे लागते ते त्यांच्या आत्मकथनात उमटलेले दिसते, परंतु त्यास काही व्यक्तींची आत्मकथने अपवाद ठरतात. त्यापैकीच 'चाकाची खुर्ची' हे एक मुस्लिम मराठी आत्मकथन आहे. मुस्लिम 'धर्मामुळे' नसीम हुरजूक यांच्या जीवनावर किंवा कार्यावर कोणताच चांगला अगर वाईट परिणाम झालेला आढळत नाही. एक भारतीय अपंग महिला म्हणूनच लेखिकेच्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक आणि मानसिक अशा विविध अंगांचे वास्तवदर्शन या आत्मकथनातून येते.

नसीमा हुरजूक यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीची चर्चा आत्मकथनाच्या अंतरंगाच्या आधाराने केलेली आहे. प्रेमळ कुटुंबिय, अबोल सोशिकता, उच्चविचारशीलतेचे संस्कार, श्रमप्रतष्ठेचे बाळकडू, प्रखर तत्त्वनिष्ठा, समंजस मैत्रीभाव, कलासक्ती, अशुभाचा संकेत, संवेदनशीलता, सृजनशीलता, झुंजार साधकाची वृत्ती, आत्मविश्वास, आत्मभान व ध्येयनिष्ठा अशा वैशिष्ट्यांनी युक्त असे बालपणापासूनचे लेखिकेचे व्यक्तिमत्त्व घडत गेले.

लेखिकेला तारूण्याच्या उंबरठ्यावरच मरणप्राय वेदना देणाऱ्या अपंगत्वाने गाठले. शारीरिक दु:ख, वेदना, मनाविरूद्ध घडलेल्या घटना, वडिलांचा मृत्यू, शिक्षणाची वाताहत, कुटुंबाची फरफट यामुळे नैराश्येच्या गर्तेत कोसळणाऱ्या मानसिकतेला लेखिकेने उसळण्याची, उलटी प्रतिक्रिया करण्याची गती दिली. या मानसिक व शारीरिक संघर्षात बाबूकाकांच्या प्रेरणादायी सहकार्याचे आणि कुटुंबियांच्या एकात्म-प्रेमळ सहकार्याचे फार मोठे योगदान आहे. लेखिकेने स्वत:च्या अपंगत्वावर मात करून आणि अनेक अडचणीवर मात करून 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' संस्थेची उभारणी केली. त्यासाठी लेखिकेला सामाजिक संघर्ष, दुष्ट प्रवृत्तीशी संघर्ष, मन:संघर्ष, आर्थिक संघर्ष आणि शासकीय समस्यांना तोंड द्यावे लागले. या सर्व संघर्षपटात अनेक स्तरातील व्यक्तींशी लेखिकेचा संबंध आला. बरे-वाईट अनुभव आले. समस्या निर्माण झाल्या. सहकार्यही मिळाले. घटना-प्रसंगात अनेक व्यक्ती आल्या. त्यामुळे या आत्मचरित्रात अनेक सुंदर व्यक्तिरेखाटने आलेली आहेत.

संस्थाकार्यात यश मिळविण्यासाठी अपंगांना आत्मविश्वास देण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी लेखिकेने घेतलेल्या सहली, शिबिरे, क्रीडा स्पर्धा सहभाग, समुपदेशन, विवाह जुळणी इत्यादी माध्यमातून केलेले कार्य म्हणजे अपंगांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक पुनर्वसनाचे - सक्षमीकरणाचे कार्य ही लेखिकेच्या सामाजिक कार्याच्या यशाची वाटचाल आहे.

'चाकाची खुर्ची' या आत्मकथनाच्या अंतरंगातील व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग, भाषाशैली आणि या आत्मकथनाचे वेगळेपण या बाबींची चर्चा संशोधनाच्या अंगाने झाली आहे. नसीमा हुरजूक यांनी आपल्या जीवनात आलेल्या महत्त्वपूर्ण व्यक्तींचे चित्रण घटना-प्रसंगानुसार केलेले आहे. त्यात लेखिकेच्या कुटुंबातील व्यक्ती आहेत. त्यातील लेखिकेच्या आई-वडिलांच्या व्यक्तिरेखा आपल्या स्वभाववैशिष्ट्यांनी वेधक ठरतात. त्याशिवाय लेखिकेचे भाऊ-बहिण-भावजय इत्यादी रक्तसंबंधातील व्यक्तिरेखा प्रभावी ठरल्या आहेत. प्रेमळपणा व कौटुंबिक एकात्मता या दृष्टीने या व्यक्तिरेखा वेधक ठरतात. आई-वडिलांच्या कृती-उक्ती-विचारातून लेखिकेवर झालेले संस्कार लेखिकेला असामान्यत्वाकडे नेण्यास पायाभूत ठरले आहेत.

अपंगत्वाने नैराश्येकडे झुकलेल्या लेखिकेला जीवनाचे आव्हान स्वीकारून समर्थ बनविण्यास 'बाबूकाकां'ची व्यक्तिरेखा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. आपल्या अपंगत्वाला धैर्याने सामोरे जाण्याची झुंजार मानसिकता लेखिकेत बाबूकाकांनी निर्माण केली एवढेच नव्हेतर समाजातील इतर अपंगांचे पुनर्वसन करण्यासाठी 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' ही संस्था उभारण्यात व समर्थपणे चालविण्यात लेखिकेला खंबीर व कार्यक्षम बनविण्यात बाबूकाका गॉडफादर ठरतात.

अपंग असूनही स्वावलंबनाने जीवन जगणारे 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' या संस्थेतील काही व्यक्ती आणि या संस्थेच्या कामासाठी लेखिकेच्या सहवासात आलेल्या काही व्यक्ती या आत्मकथनात चित्रित झाल्या आहेत. वैविध्य, वैचित्र्य आणि विलक्षणता हे या व्यक्तिरेखांचे विशेष आहेत. बुद्धिमत्ता, प्रतिभा, रसिकता, कला, सुबत्ता यांची देण असणाऱ्या शैलेंद्र जोशींना अपंगत्व शापासारखे भिडले आहे. अपंग असणाऱ्या आणि अपंग नसूनही अपंगांच्या पुनर्वसन कार्याकडे आकर्षित होऊन आपले योगदान देणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण

व्यक्तिरेखांचे चित्रण हे या आत्मकथनाचे एक खास वेगळेपण कसे आहे हे स्पष्ट झाले आहे.

लेखिकेच्या संस्थाकार्यात सहकार्य करणाऱ्या व समस्या निर्माण करणाऱ्या, तसेच लेखिकेच्या खाजगी जीवनात सौख्यदायी ठरलेल्या तसेच क्लेशदायी ठरलेल्या अशा चांगल्या वाईट दोन्ही प्रकारच्या व्यक्तिरेखांचे चित्रण या आत्मकथनात आले असले तरी सकारात्मक दृष्टिकोनाच्या लेखिकेने वाईटापेक्षा चांगल्या घटकांना उजळ करण्याकडे कटाक्ष ठेवलेला आहे. या चित्रणात तटस्थता, संयम, वेचकता आणि अल्पाक्षरी शैलीचे प्रत्यंतर येते. लेखिकेचे सामंजस्य, जाणतेपणा आणि सामाजिक मानसिकता या वैशिष्ट्यांतून उतरलेली ही व्यक्तिरेखाटने या आत्मकथनात लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वासही उठाव आणतात.

या आत्मकथनातील घटना-प्रसंग वेचक, वेधक आणि लेखिकेचा जीवनपट सुस्पष्ट व सुसंगत मांडणारे आहेत. या घटना-प्रसंगातूनच व्यक्तिरेखांची प्रभावळ दृगोचर होते. घटना-प्रसंग व व्यक्तिरेखांची गुंफण आत्मकथेला सौष्ठव आणि जिवंतपणा आणते. घटना-प्रसंग व व्यक्तिरेखा लेखिकेच्या जीवनकार्याशी निगडीत असल्यामुळे त्यातील एकही प्रसंग अगर व्यक्तिरेखा आगंतुक वाटत नाही.

लेखिकेची भाषाशैली साधी, सरळ, अर्थवाही आहे. अलंकारिक-नटवी नसून सुसंवादी व रसाळ आहे. या शैलीस अल्पाक्षरी गुणधर्म असल्यामुळे पाल्हाळाचा दोष लागत नाही. अत्यंत नेमकेपणाने घटना-प्रसंग व व्यक्तिरेखाटन आल्यामुळे हे आत्मकथन लेखिकेचा जीवनपट सुसंगत, सुस्पष्ट व प्रभावी झाला आहे.

'चाकाची खुर्ची' या आत्मकथनातील नसीमा हुरजूक यांचे वेगळेपण स्पष्ट करताना लेखिकेने अपंगत्वाशी केलेल्या संघर्षाचा वेध घेतला आहे. लेखिकेने दु:ख वेदनेला सातत्याने झुंज देताना केलेल्या विचार-चिंतनातूनच स्वत:चा आत्मशोध घेतला. मूळातच जिद्दी स्वभावाची असल्यामुळे जीवघेण्या अपंगत्वावर लेखिका मात करू शकली.

लेखिका नसीमा हुरजूक यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगळेपणामुळे व स्वभाववैशिष्ट्यांमुळे त्या स्वत:च्या अपंगत्वावर मात करून समाजातील इतर अपंगांसाठी एक पुनर्वसनाचे भरीव कार्य करू शकल्या. सृजनशीलता, संवेदनशीलता, सामाजिक जाणीव, झुंजार वृत्ती, आव्हान स्वीकारण्याची विजीगिषुवृत्ती, लोकसंग्राहकवृत्ती अशा वेगळ्या

स्वभाववैशिष्ट्यामुळे लेखिकेने 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' ही संस्था उभी केली व यशस्वीपणे चालविली. संस्थेला आणि संस्थापिकेला गौरवास्पद कार्याबद्दल जे अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले, मान-सन्मान मिळाले त्याची माहिती या प्रकरणात देऊन अखेरीस नसीमा हुरजूक यांच्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचे सूचन केलेल आहे. लेखिकेचे व्यक्तिमत्त्व अनेक गुणसमुच्चयाने वेगळे ठरते. बंडखोरपणा, खेळकरवृत्ती, परोपकारीवृत्ती, सत्यनिष्ठा, स्वाभिमान, कर्तव्यकठोरता व कर्तृत्वशीलता अशा अनेक गुणांमुळे त्यांच्याकडून 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' या संस्थेचे मोठे कार्य झाले व त्या लोकोत्तर ठरल्या.

'आकांक्षा पुढती आम्हा गगन ठेंगणे ......'

असे आत्मविश्वासाने म्हणण्या इतपत लेखिका व त्यांच्या 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड' संस्थेचे आत्मबळ मोठे आहे.